# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २३.०७.२०२६ गुरुवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची एनडीपीएस व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २२.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०७ ईसमांवर कारवाई करून १,००,६००/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे. जुगार कायद्याअन्वये ०१ केसमध्ये ०१ इसमावर कारवाई करुन ५४०/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच, कलम १३५ मपोका कायद्यान्वये ०१ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २.०५२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,१६,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) **युनिट क्र. २ गांजा कामगिरी : गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २२.०७.२०२६ चे ११.४५ वा. ते १५.२५ वा. चे दरम्यान, युनिट क्र. २ चे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे धंतोली हद्दीत, सरस्वती नगर, तकीया धंतोली येथे सोनटक्केचे घरी किरायाने राहणारा आसिफ आरीफ खान वय ३२ वर्ष याचे घराची पंचासमक्ष झडती घेतली असता, त्याचे ताब्यात अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी २ किलो ६९ ग्रॅम मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा, वजन काटा, प्लास्टीक पाऊच सिल मशिन व मोबाईल असा एकुण ५६,३८०/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीची सखोल विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथिदार पाहिजे नामे शैलेश सोनटक्के वय ३० वर्ष याचेसह संगनमताने गांजा आणल्याचे सांगीतले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्‌याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब)(ii)(ब), एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे धंतोली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मपोनि. श्रीमती शुभांगी देशमुख, पोउपनि मनोज राऊत, सफौ. गजेंद्र ठाकूर, पोहवा महेंद्र सडमाके, प्रविण शेळके, कमलेश गणेर, विजय यादव, अर्जुन यादव, नापोअं. सुरेश तेलेवार, आशिष धंदरे, पोअं मंगल जाधव, संदीप पांडे, प्रविण चव्हाण, विवेक श्रीपाद यांनी केली.



**३) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २२.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दि. २३.०७.२०२६ चे ००.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीस हे पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन धरमपेठ, शिवाजीनगर, संगणक भवन स्पोर्ट सेंटर समोर, सार्वजनिक रोडवर सापळा रचून, एका बर्गमन मोपेडवरुन आलेल्या इसमास थांबवुन, पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव, १) नावेद उर्फ नेहाब अहमद शेख वय २६ वर्षे, रा. घर क्र. ३११/३३, सैयद बाबा दर्गाहजवळ, वंजारी नागपूर असे सांगीतले. त्याचेजवळ आलेल्या दुसऱ्या इसमास नाव विचारले असता, त्याने लखन हेमराज हिरणवार वय २१ वर्ष रा. गवळीपुरा, नवयुवक दुर्गा मंडळ जवळ, धरमपेठ, नागपूर असे सांगितले. त्यांचे जवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्यांची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण ९ ग्राम एम.डी. पावडर मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०२, मोबाईल फोन, बर्गमन मोपेड गाडी असा एकुण २,८०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता देवाण घेवाण करतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दीपक, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, पोहवा विवेक आढाव, शेख इमरान, ज्ञानेश्वर भोगे, नितीन साळुंके, मपोहवा अनुप यादव, पोअं. संतोष शेंद्रे, नितीन राठोड, धनराज मेश्राम यांनी केली.

**४) गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाची कामगिरी :—**

दिनांक २०.०१.२०२६ चे १२.३० ते १५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे शांतीनगर हद्दीत राहणाऱ्या ३७ वर्षीय फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी ही राहते घरी कोणाला काहीही न सांगता घरून निघुन गेली होती. ती घरी परत न आल्याने, तिचा शोध घेतला असता, ती मिळुन आली नाही. तिचे अल्पवयीन असल्याचा फायदा घेवुन, तिला कोणीतरी अज्ञात आरोपीने फुस लावुन पळवुन नेले, अशा फिर्यादी यांचे तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे कलम १३७(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना दिनांक २२.०७.२०२६ रोजी माहीती मिळाली की, यातील मुलगी हिने तिचे प्रेमसंबंध असलेल्या प्रज्वल मारोती ठोंबरे वय २१ वर्ष रा. भिसी, चिमुर जि. चंद्रपुर याचे सोबत लग्न केल्याचे समजल्याने त्यांचेशी संपर्क करुन दोघांनाही गुन्हेशाखा कार्यालयात बोलावून त्यांची सविस्तर विचारपूस केली. मुलीचे समुपदेशन करण्यात आले. दोघांनाही पुढील कारवाईस्तव शांतीनगर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपुर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली, मपोनि. संजीवनी थोरात व त्यांचे पथकाने केली.



**५) बेलतरोडी पोलीसांची कामगिरी :— हरविलेला मुलगा पालकांचे स्वाधीन.**

दिनांक २२.०७.२०२६ चे १८.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत, चिचभवन परिसरात बिट मार्शल पेट्रोलींग करीत असता, त्यांना एक अल्पवयीन मुलगा नामे वसंत सुरज धुर्वे वय ११ वर्ष हा मिळाल्याने त्यांनी त्याचेसह परिसरात नातेवाईकांचा शोध घेतला. परंतु कोणतीही माहिती न मिळाल्याने, पोलीस ठाणे बेलतरोडी येथे मुलास घेऊन आले. मुलगा पालकांची ठोस माहिती देत नसल्याने, त्याला विश्वासात घेऊन सलोख्याने विचारपुस केली असता, तो मध्यप्रदेश येथील असल्याचे व वडील व काका मजुरी काम करीत असल्याची माहिती मिळाली. सपोनि कांडुरे व पोहवा रविंद्र आकरे यांनी मुलासोबत शोधमोहीत राबवून शंकरपुर गाव परिसरात मुलाचे वडील सुरज बैसाख धुर्वे वय ४५ वर्ष रा. भिमा ता. हैदर जि. बालाघाट, मध्यप्रदेश हे शंकरपुर पांजरी मार्गावरील लेवरेज सिटी कंस्ट्रक्शन साईटवर काम करित असल्याची माहिती काढली. मुलाचे पालकांची आवश्यक खात्री करुन मुलाला त्यांचे ताब्यात सुखरुपपणे सुपुर्द करण्यात आले.



**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे गणेशपेठ :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे गणेशपेठ हद्यीत, अशोक चौक जवळ, साई होंडा शोरुम, टु व्हीलर कंपनी येथे फिर्यादी सचिन श्रीराम गुल्हाने वय ५१ वर्षे, रा. राधाकृष्ण नगर, नागपूर हे अकाऊंट मॅनेजर म्हणून काम करतात. कंपनीमध्ये विलास नायक वय ३८ वर्ष रा. मट्टीपुरा, सिरसपेठ, इमामवाडा, नागपूर हा स्पेअर पार्ट विभागात मॅनेजर म्हणून काम करतो. दिनांक २२.१०.२०२५ चे ११.०० वा. ते ०८.०६.२०२६ चे १७.०० वा. चे दरम्यान आरोपी विलास नायक याने ग्राहकांनी विकत घेतलेल्या स्पेअर पार्टचे पैसे कंपनीत जमा न करता, त्याची पत्नी पिंकी विलास नायक हिचे बॅकचे क्युआर कोडवर परस्पर घेतले. आरोपीने कंपनीचा विश्वासघात करुन एकूण ७,००,०००/— रुपयांचा अपहार करुन कंपनीची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्जाचे चौकशीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे पोउपनि. नुलगुडावार ७५०७१०८४२७ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६(४),३१८(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा न्यायाधीश—२२ आणि अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | ७७१/ २०२५ | कलम ३३२, ३४ भा.दं.वि. | सुमेध आनंदराव मुन रा. न्यु सुरजनगर, सुरज धोटेच्या घरा जवळ, पोलीस ठाणे अजनी, नागपुर | २९.०७.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**